महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

# मत्स्य विज्ञान महाविद्यालय,

हजारी पहाड रोड, सेमीनरी हिल्स्, नागपूर—06

जा. क्र. सअ/मविम/दरपत्रक सुचना/भंगार सामान विल्हेवाट/ 712 /2026 दिनांक : 05/08/2026

## विनावापर निरुपयोगी भंगार साहित्याचे दरपत्रके पध्दतीने विक्री करणेसाठी

## दरपत्रक सुचना

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत मत्स्य विज्ञान महाविद्यालय, हजारी पहाड रोड, सेमिनरी हिल्स, नागपूर—440006 येथील विनावापर निरुपयोगी जडवस्तू संग्रहाची (भंगार साहित्याची) विक्री दरपत्रक पध्दतीने करण्यात येणार आहे. विक्रीसाठी उपलब्ध असलेले साहित्य महाविद्यालय परिसरात दिनांक 06/08/2026 ते 12/08/2026 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी 2.00 ते 4.00 वाजेपर्यंत पहावयास उपलब्ध राहणार आहे.

| अ. क. | वस्तुंचे नांव | परिमाण | विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांनी मंजूर केलेले दर |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | निरुपयोगी टायर टयुब | प्रती नग | रु.150/— |
| 2 | निरुपयोगी लोखंडी भंगार | प्रती किलो | रु.35.25/— |
| 3 | निरुपयोगी लाकडी भंगार | प्रती किलो | रु.18/— |

वरील तक्त्यातील अ.क्र. 4 मध्ये दर्शविलेल्या रकमेपेक्षा जास्तीत जास्त दर देणा—या दरपत्रक धारकास उपरोक्त साहित्याची विक्री करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खरेदीधारकाने दरपत्रकाद्वारे भाग घ्यावयाचा असेल त्यांनी सिलबंद लिफाफ्यात दरपत्रक दिनांक 12/08/2026 सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत. अटी व शर्ती महाविद्यालयाच्या कार्यालयात तसेच www.cofsngp.mafsu.ac.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. सिलबंद लिफाफा दिनांक 13/08/2026 रोजी दुपारी 12.00 वाजता उघडण्यात येणार आहेत.

(डॉ. प्र. आ. तेलवेकर)
सहयोगी अधिष्ठाता
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर

## दरपत्रक सुचना
## अटी व शर्ती

1. भंगार साहित्यांची विल्हेवाट लावण्याकरीता दिनांक 13/08/2026 रोजी दुपारी 12.00 वाजता नियुक्त केलेल्या समितीसमोर दरपत्रकाचे सिलबंद लिफाफे उघडण्यात येतील.
2. सिलबंद लिफाफा मा. सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर यांचे नांवे सादर करण्यात यावा, तसेच लिफाफ्यावर **"दरपत्रक – भंगार साहित्य खरेदी "** असे लिहिणे गरजेचे आहे. फर्मचे/व्यक्तीचे भंगार व्यापाराचे (Scrap Merchant) गुमास्ता प्रमाणपत्र/नोंदणी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादी दस्तावेजाची छायांकित प्रत दरपत्रका सोबत जोडून कार्यालयात दिनांक 12/08/2026 रोजी सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत सादर करावे. त्यानंतर सदर दस्तावेज स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
3. सर्व निरुपयोगी भंगार वस्तू या महाविद्यालयाच्या परिसरात ठेवण्यात आलेल्या आहेत.
4. कुठलेही कारण न दाखविता दरपत्रक रद्द/स्थगित करण्याचे संपूर्ण अधिकार समितीला राहील.
5. सिलबंद लिफाफे उघडण्यात आल्यानंतर ज्या फर्मचे/व्यक्तीचे दर सर्वात जास्त असेल त्या फर्म/व्यक्तीने संपूर्ण रक्कम त्याच दिवशी महाविद्यालयाच्या रोखपालाकडे जमा करुन पावती घेण्यात यावी.
6. खरेदी केलेली भंगार सामुग्रीची रक्कम भरणा केल्यानंतर संबंधीतांनी लवकरात लवकर संपूर्ण सामुग्रीची उचल स्वखर्चाने करावी लागेल.

(डॉ. प्र. आ. तेलवेकर)
सहयोगी अधिष्ठाता
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर

**Annexure – I**

**Declaration confirming the absence of any conflict of interest**

I, the undersigned ______________________________________________

(Name of Firm) submitting a quotation in respect of call for quotation reference number ___________________ confirm that;

1. I do not have any conflict of interest with purchase office in connection to the contract.
2. I have submitted only one (single) quotation under this contract.

**Signature**
**Name/Seal of Firm**